ॐ

# अध्याय दहावा

१ ‘पुनरपि पार्था, ऐक सर्वथा देउनियां अवधान
श्रेयस्कर जें भाषण माझें’ बोले श्रीभगवान १
‘आस्था धरिसी मनीं ऐकसी प्रेमानें मद्‌बोल
म्हणुनी कथितो तव हितार्थ हें तत्त्व-ज्ञान सखोल २

२ अनादि माझा जन्म जाणती नच महर्षी नच देव
जाण सर्वथा मी चि तयांचें मूळ असें स्वयमेव ३
कोण केवढा मी कवणाचा कसें कळावें त्यांसी
मज चि पासुनी जन्म जयांचा जो मी मूळ जगासी ४
परंतु कोणी मागें वळुनी जो अंतर्मुख होई
देह विसरुनी स्व-सुखीं रमुनी गगन चढोनी जाई ५
तया स्वभावें आत्मानुभवें होतें माझें ज्ञान
जाण पांडवा, मूर्तिमंत तो शाश्वत शांति-निधान ! ६

३ लोक-महेश्वर अज अनादि मी असा जाणतो मज तो
मनुष्यांत निर्मोह सर्वथा पातकांतुनी सुटतो ७

४ उद्‌भव लय सुख दुःख अहिंसा इंद्रिय-निग्रह शांति
ज्ञान प्रज्ञा सत्य जागृति क्षमा अभयता भीति ८

५ आणिक समता दान तप तथा यशापयश संतुष्टि
पृथग्विध असे भाव जन्मती मज चि पासुनी भूतीं ९

६ जे पूर्वींचे सप्त महर्षी तसे प्रमुख मनु चार
मत्संकल्पीं जन्म पावले हे अकरा साचार १०

आणि तयांनीं पुढें निर्मिले लोक-पाळ ते जाण
जयांपासुनी जगीं जाहली प्रजा सर्व निर्माण ११

बीजामधुनी जसा होतसे वृक्षाचा विस्तार
मुळीं एकला तसा प्रकटलों धरुनी विश्वाकार ! १२

७ विस्तार असा सकल हि माझा अशी ईश्वरी शक्ति
नीट ओळखे विश्वीं देखे जो माझ्या चि विभूती १३

जगांत न दुजें जयासि सहजें माझ्यावांचुनि कांहीं
अचल योग तो तया लाभतो येथें संशय नाहीं १४

८ जळीं जन्मती तरंग-पंक्ती जळाश्रयें चि रहाती
मज चि पासुनी मदाश्रयें ती तशी विश्व-संभूति १५

जाण अर्जुना, जगा प्रेरणा मज चि पासुनी होते
मी चि जगाचें मूळ आणि तें जगद्रूपही निरुतें १६

सर्व-व्यापी स्व-रूप माझें असें जाणुनी, होती
मद्रूप चि ते ज्ञाते मातें अभेद-भावें भजती १७

भूत-मात्र जें भेटे तें तें भगवंताचें रूप
असें मानिती सुखें विहरती होउनियां तद्रूप १८

९ चित्त अर्पिती मला मानिती जे जीवन-सर्वस्व
परस्परांतें देती घेती मद्बोधाचें तत्त्व १९

अखंड गाती मद्गुण-कीर्ति देह-भाव विसरून
सुखें डोलती नाचती किती मद्रूपीं रंगून ! २०

१० असे रंगले नित्य जे भले प्रेमें माझ्या ठायीं
ज्ञान-भक्ति-सुख देवोनि तयां निज-धामातें नेईं २१

११ जाण अर्जुना, करुनी करुणा स्वयें प्रकटुनी हृदयीं
तयां दावितों तेजस्वी तो ज्ञान-दीप लवलाहीं २२

प्रकाश होतां नुरे तत्त्वतां भ्रांति-रूप अंधार
मद्भक्ताला तदा संपला जन्म-मरण-संसार !' २३

१२ पार्थ तेधवां म्हणे, 'माधवा, अससी पावन परम
तूं चि केशवा, परं-धाम तें तैसा चि पर-ब्रह्म २४

पंचविसावें 'पुरुष तत्त्व' तूं शाश्वत दिव्य अजन्मा
आदिदेव तूं सर्व-व्यापीं विश्वेश्वर परमात्मा २५

१३ असित देवल व्यास सुरर्षि नारद येतां जातां
अशी चि महती तुझी वर्णिती सकल ऋषी भगवंता, २६

१४ तूं हि बोलसी तसें चि मजसी, यथार्थ मानीं सगळें
तुझें केशवा, स्वरूप देवां तसे दानवां न कळे २७

१५ भूत-भावना भूताधिपते देवेश जगन्नाथा,
रूप तत्त्वतां जाणसी स्वतां तुझें तूंचि भगवंता ! २८

१६ तुवां आपुल्या त्या सांगाव्या दिव्य विभूती सर्व
राहिलासि तूं असा व्यापुनी ज्यांहीं सकल हि विश्व २९

१७ अतां स्वभावें जरी आघवें विश्व तूं चि योगेशा
तरी कोणत्या विशेष रूपीं ध्यावें तुज विश्वेशा ३०

तुझें तत्त्वतां रूप पाहतां ध्येय-ध्याता-ध्यान
आत्मानुभवें सहजें होती एकरूप संपूर्ण ३१

परंतु मजसी जरी सांगसी प्रमुख तुझीं जीं रूपें
भरलीं विश्वीं, मग सर्वस्वीं तुझें ध्यान तें सोपें ३२

१८ श्रीजनार्दना, करुनी करुणा तुझी ईश्वरी शक्ति
मज सांगावी सविस्तर अशी पुनरपि आत्म-विभूति ३३

त्वद्वच पडतां श्रवणीं लाटा आनंदाच्या उठती
परमामृत तें किती सेविलें तरी न होई तृप्ति !’ ३४

१९ ‘बरें सांगतों’ योगेश्वर तो म्हणे, ‘विभूती माझ्या
ऐक भारता, दिव्य आणखीं प्रधान असती ज्या ज्या ३५

पार्था, असती जरी विभूती असंख्य आणि अपार
तरी त्यांतुनी पुन्हां निवडुनी कथितों थोड्या फार ३६

२० जाण पांडवा, मी भूतांचा असें आदि-मध्यान्त
नित्य राहतों आत्म-रूप मी सर्वांच्या हृदयांत ३७

२१ असें 'विष्णु' तो मी आदित्यीं 'भास्कर' मी ज्योतींत
मी चि 'मरीची' मरुतांमाजीं 'शशि' मी नक्षत्रांत ३८

२२ वेदांमाजीं 'सामवेद' मी असें 'इंद्र' देवांत
इंद्रियांत 'मन' असें 'चेतना' मी चि भूत-मात्रांत ३९

२३ मदनांतक तो 'सदाशिव' असें मी अकरा रुद्रांत
यक्ष-राक्षसांमाझारिं तसा 'कुबेर' मी धनवंत ४०

असें पांडवा, 'पावक' तो मी अष्ट वसूंमाझारीं
सप्त पर्वतीं प्रमुख असा तो 'मेरू' मी अवधारीं ४१

२४ तो 'बृहस्पती' मी पुरोहितीं मुख्य असे निभ्रांत
सेनानींत 'स्कंद' जाण मी 'सागर' जल-राशींत ४२

२५ असे 'भृगुऋषी' महर्षींत मी आणिक सकलाधार
पर-ब्रह्म मी वाणींत असें 'एकाक्षर ॐकार' ४३

मी यज्ञीं 'जप-यज्ञ' सहज जो नित्य-सुखाची खाण
स्थावरांत नग-राज 'हिमालय' मी चि सर्वथा जाण ४४

२६ सुरर्षिमाजीं 'नारद' तो मी वृक्षीं मी 'अश्वत्थ'
सिद्धांमाजीं 'कपिलमुनी' मी गंधर्वी 'चित्ररथ' ४५

२७ अश्वीं 'उच्चैःश्रवा' तो चि मी जो अमृतोद्भव साच
'ऐरावत' तो गजेंद्रांत मी नरीं 'नरेश' तसाच ४६

२८ जाण ‘वज्र’ तें आयुधांत मी ‘काम-धेनु’ गायींत
मी चि ‘वासुकी’ सर्पांत असें ‘अनंग’ जन्मवित्यांत ४७

२९ जल-चरांत मी ‘वरुण-देवता’ ‘अनंत’ मी नागांत
मी चि ‘अर्यमा’ पितरांत तसा ‘यम’ निग्रह-कर्त्यांत ४८

३० दैत्य-कुळीं ‘प्रह्लाद’ तो चि मी ‘काळ’ मोजणारांत
श्वापदांत वन-राज ‘सिंह’ मी असें ‘गरुड’ पक्ष्यांत ४९

३१ शस्त्र-धारकीं ‘राम’ असें मी ‘पवन’ वेगवंतांत
जलौघांत मी असें ‘जाह्नवी’ ‘मगर’ मी चि मत्स्यांत ५०

३२ मी चि चराचर सकल सृष्टिचा असें ‘आदि-मध्यान्त’
जाण ‘सुविद्या अध्यात्माची’ मी चि सर्व विद्यांत ५१

३३ असें अक्षरीं ‘अकार’ तैसा ‘तत्त्व-वाद’ वक्त्यांचा
मी चि सर्वथा ‘सर्व-व्यापी धाता’ सकल जगाचा ५२

आणि समासीं ‘द्वन्द्व’ पांडवा, मी ‘अविनाशी काळ’
जो पंचमहाभूतात्मक तें ग्रासी सांज-सकाळ ५३

३४ ‘मृत्यु’ मी चि तो हिरुनी घेतो जो सर्वांचे प्राण
आणिक भावी जीव-सृष्टिचें मी ‘उत्पत्ति-स्थान’ ५४

असें ‘कीर्ति’ मी ‘मेधा’ ‘लक्ष्मी’ तशी ‘स्मृती’ अवधारीं
‘वाक्’ ‘क्षमा’ ‘धृति’ सप्त विभूती ह्या नारींमाझारीं ५५

३५ तेविं अर्जुना, ‘बृहत्साम’ मी असें साम-सूक्तांत
सकळां छंदीं मी ‘गायत्री’ मंत्र-सार निभ्रांत ५६

मासांमाजीं ‘मार्गशीर्ष’ मी ऋतूंत मी चि ‘वसंत’
३६ ‘जय’ ‘निश्चय’ मी असे ‘सत्त्व’ तें मी चि सत्त्ववंतांत ५७
चोरी चि परी चव्हाट्यावरी उघडपणें जी सहज
कपट-पटूंचें ‘द्यूत’ मी चि तें तेजस्व्यांचें ‘तेज’ ५८
३७ ‘अर्जुन’ तूं जो तो मी चि असें तुम्हां पांडवांमाजी
‘वासुदेव’ तो यादवांत मी उभा तुजपुढें आजी ५९
मुनि-गणांत मी असें भारता, ‘व्यास’ हि तो मुनि-वर्य
तेविं पांडवा, मी चि दैत्य-गुरु कवींत ‘शुक्राचार्य’ ६०
३८ दमवंतांचा ‘दंड’ असें मी गूढांमाजीं ‘मौन’
जयेच्छूंसि मी ‘नीति’ अर्जुना, मी ज्ञात्यांचे ‘ज्ञान’ ६१
३९ असें सर्वथा तें हि मी चि जें बीज सर्वभूतांचें
लेशमात्र न च माझ्याविण तें चराचरीं जें साचें ६२
४० वर्णुं मी किती दिव्य विभूती गणती चि नसे ज्यांस
सात पांच परि मुख्य दावुनी कथिलासे सारांश ६३
तरि धनंजया, चराचरीं ह्या सान थोर नेणावें
अभेद-भावें वस्तु-जात तें मद्रूप चि मानावें ६४
४१ मद्विभूति ह्या ओळखावया सामान्य अशी खूण
सांगें तुजसी जेणें मजसी जाणशील संपूर्ण ६५
असे वस्तु जी उदात्त अथवा वैभवशाली येथ
अंश निश्चितीं मत्तेजाचा ती ती जाण यथार्थ ! ६६

४२ अथवा पार्था, कशासि आतां बहुत-विभूति-ज्ञान
असे व्यापिलें जग हें सगळे मी एकांशें जाण !' ६७

येथें भावार्थ गीतेचा दशमाध्याय संपला ।
विभूति-योग साद्यन्त असे ह्यांत निवेदिला ॥ १० ॥